नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 17/02/2021 (बुधवार)
(दुपार)

---

## अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 06 कि.मी. अंतरावरील मौजा मोखाडा येथे दिनांक 15/02/2021 चे 20:00 वा. ते दिनांक 16/02/2021 चे 08:00 वा. दरम्यान एमएच–36/एस–7871 क्रमाकाच्या मोटरसायकलचा चालक आरोपी नामे– वैभव विठ्ठल सवासागडे, वय 24 वर्ष, रा. मोखाडा याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकलवर शुभम रविन्द्र मघाम वय 21 वर्ष व गंगाधर विठ्ठल उईके वय 35 वर्ष यांना ट्रिपल सिट बसवुन भिवापुर वरून मोखाडा कडे घेउन जात होता. त्यादरम्यान आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने अचानक मोटार सायकल स्लिप झाल्याने गाडीचे नियंत्रण बिघडले त्यामुळे मागे बसलेला शुभम रविन्द्र मघाम वय 21 वर्ष रा. मोखाडा हा जखमी झाला. तर गंगाधर विठ्ठल उईके वय 35 वर्ष रा. मोखाडा याचे मरणास आरोपी कारणीभुत ठरला व आरोपी आपली मोटरसायकल घेवुन पळुन गेला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा भगवानदास यादव यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134(अ), 137(ब) मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. भस्मे 9764946808 हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत ड्रिमसिटी जवळ मोहपा रोड उमरेड येथे दिनांक 16/02/2021 चे 18:30 वा. दरम्यान मृतक नामे– वरसेल वसराम चव्हाण, वय 45 वर्षे, रा. मोहपा हा आपले एमएच–40/बियु–3647 क्रमाकाच्या मोटरसायकने उमरेड येथुन भाजीपाला घेवुन परत येत असतांना ड्रिमसिटी जवळ मोहपा रोड उमरेड येथे विरूध्द दिशेने येणाऱ्या एमएच–40/एके–6810 क्रमांकाच्या टाटा मॅजीक वाहनचा चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतक चे मोटरसायकला धडक देवुन वरसेल चव्हाण याचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विशाल वरसेल चव्हाण, वय 21 वर्षे, रा. मोहपा ता. उमरेड जि. नागपुर यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/लोले मो.क्र. 8080290808 हे करीत आहे.

3) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावर मौजा खानगाव रोड श्रीकृष्ण मंगल कार्यलय जवळ सावनेर येथे दिनांक 16/02/2021 चे 15:30 वा. दरम्यान अज्ञात ट्रॅक्टरचा चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच–40/एबी–9092 क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात चालक मोटरसायकल चालक नामे– निखील बबनदास महंत (मृतक) वय 32 वर्ष रा. खानगाव ता. सावनेर व त्याच्या पाठीमागे बसलेला निखील मानकर वय 20 वर्ष रा. सावनेर हे दोघेही जखमी झाले. त्यांना ग्रामीण रूग्णालय सावनेर येथे उपचारा करिता नेले असता निखील बबनदास महंत यास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अतुल बबनदास महंत वय 33 वर्ष रा. खानगाव ता. सावनेर यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि कांरडे मो.क्र. 7722011228 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर